भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/११/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक १४/११/२०१६ रोजी २३.३० ते २३.४५ वा. दर. यातील फिर्यादी राजु नत्थु नागदेवे वय ४२ वर्ष रा. वरठी हा कव्वालीचा कार्यक्रम पाहण्याकरीता टेकेपार येथे आपली हिरो होन्डा स्पेन्डर प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ४७०८ कि. २०,०००/–रु. ची खुल्या जागेत लॉक करुन ठेवली टिकीट काढण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) बँक व कंपनीचा विश्वासघात करुन पैश्याची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/११/२०१६ चे रात्र दर. यातील आरोपी हे एटीएम असोशिएट म्हणुन लॉजीकेस सोलुशन प्रा.ली कंपनीतर्फे नियुक्तीस असुन बँक मधील कॅश प्राप्त करुन एटीएम मशीन मध्ये डिपाजीट करण्याचे काम त्यांना कंपनीतर्फे विश्वासाने सोपविण्यात आले. असतांना त्यांनी संगनमताने बँक व कंपनीचा विश्वासघात करुन बँकेकडुन प्राप्त केलेली पुर्ण रक्कम एटीएम मशिन मध्ये लोडींग न करता एकुण १७,१४,८००/–रु. रक्कम स्वत:चे आर्थीक फायदयाकरीता गैर वापर करुन अफरातफर केल्याने फिर्यादी प्रशांत अशोक वाहने वय ४१ वर्ष, रा. नागपुर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४०९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लाखडे पोस्टे लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) विहीरीत मृत अवस्थेत इसमाचे प्रेत मिळुन आले. . :–**

दिनांक १३/११/२०१६ रोजी ०५.३० ते १५/११/२०१६ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी वासुदेव विठोबा बावनकर वय ६० वर्ष, रा. सिवील वार्ड साकोली यांचा मृतक मुलगा सुनील वासुदेव बावनकर वय ३६ वर्ष, हा सकाळी ५.३० वा. दर. फिरायला जातो म्हणुन घरुन निघुन गेला होता. शोध घेतला असता त्याचे प्रेत तहसील कार्यालय साकोली येथे विहरीत मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १५/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ११९ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १३ केसेस, अवैध प्रवासी ०६ व ईतर वाहनांवरती १०० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

१६/११/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.